**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 19.06.2019.**

तालुका मंडळ कृषी अधिकारी कार्यालय, बदनापुर येथील श्री. संतोष बाळाभाऊ जाधव, वय 36, व्यवसाय नोकरी कृषी तज्ञ (कंत्राटी) , तालुका मंडळ कृषी अधिकारी कार्यालय, बदनापुर, **यांना 40,000/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री. संतोष बाळाभाऊ जाधव, वय 36, व्यवसाय नोकरी कृषी तज्ञ (कंत्राटी) , तालुका मंडळ कृषी अधिकारी कार्यालय, बदनापुर, रा.रामनगर पोलीस कॉलनी जवळ, बालाजी नगर, जालना. |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.19.06.2019 रोजी संभाजी ऊद्यानासमोर, मोतीबाग, जालना. |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 40,000/- रुपये |

याबाबत हकीगत अशी की, तक्रारदार याची ग्रामीण विकास संस्था असुन सदर संस्थेमार्फत कृषी विभागाकडुन गावातील बचत गटांना,भुमीहीन व अल्पभुधारकांना प्रशिक्षण दिले जाते. सदर संस्थे मार्फत बदनापुर तालुक्यातील पाच गावातील बचत गटांना,भुमीहीन व अल्पभुधारकांना प्रशिक्षण तीन महिन्यापुर्वी दिलेले आहे. सदर प्रशिक्षण दिल्या बाबतचे बिल मिळणेकामीची फाईल तक्रारदार यानी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय जालना येथे दाखल केलेली होती. सदरचे बोगस प्रशिक्षण दिले बाबतची तक्रार जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय येथे प्राप्त झाल्यांने त्यावरुन संस्थेची चौकशी सुरु होऊन बिल प्रलंबित ठेवलेले आहे.

सदर तक्रारी संबंधाने चौकशीचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने देण्यासाठी व सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे बिल साहेबांना सांगुन कार्यालयातुन काढुन देण्यासाठी आलोसे श्री जाधव, कृषी तज्ञ यांनी 60,000/- रुपये दयावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.18.06.2019 रोजी सतकर कॉम्पलेक्स जालना येथे जावुन पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान पंचा समक्ष कृषी तज्ञ श्री जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची चौकशीचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने देण्यासाठी व सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे बिल साहेबांना सांगुन कार्यालयातुन काढुन देण्यासाठी 60,000/- रुपयाची मागणी करुन दि.19/06/2019 रोजी स्विकारण्यास तयार झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन दि.19.06.2019 रोजी संभाजी ऊद्यानासमोर, शिवा आष्टी टी हाऊस, जालना येथे लाचेचा सापळा लावला असता आरोपी लोकसेवक श्री.जाधव, कृषी तज्ञ, तालुका मंडळ कृषी अधिकारी कार्यालय, बदनापुर यांनी तक्रारदार यांचेकडुन अडव्हान्स म्हणुन 40,000/-रुपये पंचा समक्ष लाचेची रक्कम स्विकारली असता श्री.जाधव यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. श्री.जाधव, कृषी तज्ञ, तालुका मंडळ कृषी अधिकारी कार्यालय, बदनापुर यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.